# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

जा.क्र./रातुमनावि/म.वि.वि./७६४६/२०१७ दि. १४.०९.२०१७.

## जाहिरात

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या बृहत आराखडयातील तरतुदीनुसार शैक्षणिक सत्र २०१८–२०१९ करिता नवीन महाविद्यालये/नवीन विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/नवीन विषय/अतिरीक्त तुकडया करिता अर्ज मागविण्याबाबत.**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०७ अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार व राज्य शासनाकडुन वेळोवेळी प्राप्त झालेल्या दिशानिर्देशानुसार सत्र २०१८–२०१९ या कालावधीकरिता तयार करण्यात आलेल्या बृहत आराखडयास (Perspective Plan) राज्य शासनाद्वारे दिनांक ०८ सप्टेंबर, २०१७ चे पत्राद्वारे मंजुरी प्रदान केली असुन सदर बृहत आराखडयातील तरतुदीनुसार नवीन महाविद्यालये/नवीन विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/नवीन विषय/अतिरीक्त तुकडया याकरिता सत्र २०१८–२०१९ करिता इच्छूक संस्था/अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांकडुन दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ रोजी सायंकाळी ५.४० P.M. पर्यंत विद्यापीठाच्या www.nagpuruniversity.org या संकेतस्थळावरील Online College Section या लिंकद्वारे किंवा www.onlinebcudrtmnu.org या संकेतस्थळामार्फत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात यत आहे.

ज्या संस्थांना नवीन महाविद्यालयाकरिता तसेच अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांना नवीन विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/नवीन विषय/अतिरीक्त तुकडया करिता अर्ज सादर करावयाचे आहे, त्या संस्था/महाविद्यालयांना ऑनलाईन अर्जासाठी रु. ५५०/– विद्यापीठाच्या प्रकाशन विभागात भरुन बृहत आराखडा विकत घेऊन प्रक्रिया शुल्क रु. १६००/– विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागातील आगम विभागात भरुन त्याची पावती विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर येथील महाविद्यालय विकास विभाग येथे दिनांक २८.०९.२०१७ पर्यंत किंवा तत्पुर्वी कार्यालयीन वेळेत सादर करुन User-ID व Password प्राप्त करणे आवश्यक राहील. त्याशिवाय विद्यापीठ अधिसूचना क्रमांक : लेखा/व्यय/सा/७०, दिनांक २७.०४.२०१२ प्रमाणे अर्ज शुल्क वित्त व लेखा अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर हयांचे नांव काढलेल्या धनाकर्षाद्वारे किंवा रोखीद्वारे वित्त व लेखा विभागात जमा करुन त्याची पावती ऑनलाईन अर्जासोबत दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंत किंवा तत्पुर्वी सादर करावी. तसेच ऑनलाईन अर्जाची प्रिन्ट आऊट घेऊन सहपत्रांसह (पान क्रमांक नमुद करुन) क्रमवार पध्दतीने अर्ज शुल्काच्या पावतीसोबत हार्डकॉपी अर्ज विद्यापीठाच्या महाविद्यालय विकास विभाग, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर या कार्यालयात दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१७ रोजी सायंकाळी ५.४० P.M. पर्यंत किंवा तत्पुर्वी सादर करावा.

वरिलप्रमाणे नवीन महाविद्यालये/नवीन विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/नवीन विषय/अतिरीक्त तुकडया याकरिता प्राप्त होणाऱ्या पात्र अर्जांचा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाकडुन (MAHED) बृहत आराखडयाची छाननी करुन अहवाल सादर करण्याकरिता गठीत करण्यात येणाऱ्या तज्ञ समितीच्या शिफारशी तसेच माहेडच्या अंतिम मंजुरीच्या अधिन राहुन विचार केला जाईल तसेच बृहत आराखडयाबाहेरच्या ठिकाणासाठी नवीन महाविद्यालयाकरिता अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची संबंधीतांना नोंद घ्यावी.

संस्था/महाविद्यालयांना ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरिता आवश्यक असलेल्या मार्गदर्शक सूचना व इतर माहिती www.onlinebcudrtmnu.org या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

मा. कुलगुरुंचे आदेशान्वये

उपकुलसचिव<br>(अति. कार्यभार)<br>महाविद्यालय विकास विभाग